**नि. फौ. ख. क्र.४४५/२०२०**

सरकार वि. विजय लोकरे

**नि.क्र. ११**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांची जबानी</u>**

मी शपथेवर कथन करतो की,

**<u>माझे नाव– वैभव रमेश साबळे ,</u>**

वय–३९ वर्षे, व्यवसाय–मजुरी,

रा. अंथुर्णे, ता.इंदापूर, जि.पुणे.

**<u>सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती एन. पी. कुचेकर, यांचेमार्फत शपथेवर सुरु –</u>**

दि.२६/०४/२०१९ रोजी पोलीसांनी मला पोलीस स्टेशनमध्ये बोलविले होते. तेथे माझी एका कागदावर सही घेतली. माझेसमक्ष कोणताही पंचनामा झाला नाही. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविला. त्यावरील सही माझीच आहे. त्यातील मजकूराविषयी मला काही माहिती नाही. **<u>सहीस नि.क्र.१२</u>** देण्यात येते.

***<u>(साक्षीदार त्याच्या पुर्वीच्या बयानाशी विसंगत साक्ष देत असल्याने सरकारी वकिलांनी उलटतपासात ग्राहय असलेले प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली–परवानगी देण्यात आली.)</u>***

२. हे म्हणणे खरे नाही की, दि.२६/०४/२०१९ रोजी मला व दुसरा पंच किसन डोंबाळे याला पोलीसांनी गोतोंडी गावचे हद्दीत सुमन लोकरे यांचे घरासमोर बोलविले होते. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ हे सुमन लोकरे यांनी दाखविले. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी घटनास्थळावरून ओबडधोबड दगड जप्त केला. हे म्हणणे खरे नाही की, पंचनामा ०९.०० ते ९.४५ पर्यंत चालला. हे म्हणणे खरे नाही की, पंचनामा वाचून समजून मी सही केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला मी ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या सांगण्यावरून खोटी साक्ष देत आहे.

सरतपास पुर्ण.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे श्री.आर. आर. बनसोडे, विधीज्ञ यांचेमार्फत –</u>**

३. उलटतपास नाकारला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/–

**( ए. बी. पाटील)**

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,

इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे.

**दि.११/०९/२०२५**